महाराष्ट्र शासन
सह संचालक (उच्च शिक्षण)
१७ डॉ. आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे-४११००१
Website: www.jdhepune.info E-mail: jdhepune@gmail.com
दूरध्वनी क्रमांक ०२० - २६१२७८३३, ०२०-२६०५१६३२ फॅक्स क्रमांक ०२०- २६०५१६३२

क्रमांक: संकीर्ण-२०२४/( /२४)/पुणे विभाग दिनांक : २०-०२-२०२४

**महत्वाचे/कालमर्यादा/रोजगार मेळावा दि.२८-०२-२०२४ ते २९-०२-२०२४**

प्रति,
प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित
कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र व
शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
अहमदनगर व नाशिक.

विषय:- **अहमदनगर येथील विभागस्तरीय नमो विशेष महारोजगार मेळाव्याबाबत...**

संदर्भ:- १.शासन निर्णय, कौशल्य, रोजगार, उद्योजगकता व नाविन्यता विभाग, क्र.कौविउ-२०२४/प्र.क्र.१४/प्रशा-२, दि.०६-०२-२०२४.
२.मा.जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांचेकडील आदेश क्र.३३/कौविरोव उमाकेंअ/रोमे/३१७/२०२४, दि.०८-०२-२०२४.
३.या कार्यालयाकडील पत्र दि.१२-०२-२०२४.
४. मा.विभागीय आयुक्त, नाशिक यांचेकडील क्र.५/३४/२०२४, दि.१६-०२-२०२४.

उपरोक्त विषयाचे संदर्भात शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने बेरोजगारांना रोजगार/ स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी नियोक्ते, कारखानदार व्यापारी व सुशिक्षित बेरोजगार यांचे एकत्रीत मेळावे आयोजित करण्यात येतात. त्या अनुषंगाने **दि.२८-०२-२०२४ ते २९-०२-२०२४ रोजी अहमदनगर येथे** विभागस्तरीय नमो विशेष महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

याबाबतची सविस्तर माहिती या कार्यालयाकडील संदर्भ क्र.३ अन्वये आपणास कळविण्यात आलेली आहे. संदर्भ क्र.४ अन्वये मा.विभागीय आयुक्त, नाशिक यांनी दिलेल्या निर्देशानुसार अहमदनगर येथील विशेष नमो महारोजगार मेळाव्यामध्ये सहभागी होणाऱ्या आपल्या महाविद्यालयातील उमेदवारांची संख्या तसेच समन्वयकाचा तपशील खालील दिलेल्या गुगुल फॉर्म लिंकद्वारे **दि.२२-०२-२०२४ रोजी स.११.०० वा.** पर्यंत निश्चित पणे भरण्यात यावी. सदर रोजगार मेळाव्यामध्ये विभागातील उमेदवारांना विविध क्षेत्रात नव्याने निर्माण होत असलेल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने जास्तीत-जास्त रिक्त पदे अधिसुचित करुन उद्योजकांना मोठया प्रमाणात सहभागी करुन घेणे,

विभागातील बेरोजगार उमेदवारांना रोजगार मेळाव्याबाबत प्रचार व प्रसिध्दी करणे इ. कामकाजाचा वेळोवेळी आढावा घेऊन सुयोग्य नियोजन करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी.

गुगल फॉर्म लिंक खालीलप्रमाणे:-

https://forms.gle/१iF३w५akjHe२U२८W७

(डॉ.केशव तुपे)
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग,पुणे-१.

प्रत:-

(१) मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.
(२) मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१ यांना माहितीसाठी सविनय सादर.
(३) मा.विभागीय आयुक्त, नाशिक यांना माहितीसाठी सविनय सादर.
(४) मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना माहितीसाठी सविनय सादर.